नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १२५ Issue - 125 | वार शनिवार दि. २१ सप्टेंबर २०२४ Blow- Saturday Date 21 September 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# पीएम विश्वकर्मा योजनेतून पारंपरिकता आणि कौशल्याला नवीन ऊर्जा : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वर्धा (जिमाका) : पीएम विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून पारंपरिकता आणि कौशल्याला नवीन ऊर्जा प्रदान करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. ही योजना म्हणजे देशात हजारो वर्षापासून असलेल्या पारंपरिक कौशल्याचा वापर विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांचा एक परिपूर्ण रोडमॅप आहे. या कौशल्यामध्ये सर्वाधिक भागिदारी अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीय समाजसमुहाची आहे. या समुहातील कारागिर उद्योजक व्हावेत असा आमचा प्रयत्न असून त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान देण्यासोबतच 'सप्लाय चेन'सारख्या व्यवस्थेचा भाग व्हावे, अशी अपेक्षा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. महाराष्ट्राच्या बहुआयामी प्रगतीचा नायक शेतकरीच राहणार असून त्याच्या समृध्दीसाठी सरकार सर्व आघाड्यांवर प्रयत्नशील राहणार असल्याचीही ग्वाही प्रधानमंत्र्यांनी येथे दिली.

पीएम विश्वकर्मा योजनेचा वर्षपूर्ती सोहळा वर्धा येथील स्वावलंबी मैदानात आज पार पडला. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बोलत होते. राज्यपाल डॉ.सी.पी. राधाकृष्णन,


### राज्यातील १ हजार आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे उद्घाटन

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी, केंद्रीय राज्यमंत्री जयंत चौधरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, वनमंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा आदी उपस्थित होते.

अमरावती येथील पीएम मित्रा पार्कचे ई-भूमिपूजन आणि आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजना व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्टअप योजना या राज्य शासनाच्या दोन योजनांचा शुभारंभही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाला.

कारागिरांना प्रमाणपत्र, धनादेशाचे वितरण

प्रधानमंत्र्यांनी कळ दाबून अमरावती येथील पीएम मित्र पार्क, राज्यातील १ हजार आचार्य चाणक्य कौशल विकास केंद्रांचे उद्घाटन केले तसेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला स्टार्ट अप योजनेचा शुभारंभ केला. पीएम विश्वकर्मा योजनेच्या १ लाख कारागिरांना ओळखपत्र व प्रमाणपत्र तसेच १ लाख कारागिरांना डिजिटल कौशल्य प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. देशभरातील ७५ हजार कारागिरांना कर्जाचे वितरण देखील प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आभासी पद्धतीने करण्यात आले. पीएम विश्वकर्मा योजनेच्या वर्षपुर्तीनिमित्त भारतीय डाक विभागाने काढलेल्या विशेष डाक तिकिटाचे



अनावरण प्रधानमंत्र्यांनी केले.

सुरुवातीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चरख्याची प्रतिकृती तर केंद्रीय मंत्री जीतनराम मांझी यांनी ग्रामीण कारागिरांनी तयार केलेल्या कलाकृती भेट देऊन प्रधानमंत्र्यांचे स्वागत केले. लघु, सुक्ष्म व मध्यम विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या परंपरागत ग्रामीण कारागिरांनी तयार केलेल्या विविध आकर्षक कलाकृतींच्या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमास आमदार सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, डॉ.पंकज भोयर, दादाराव केचे, समीर कुणावार, माजी खासदार रामदास तडस, प्रभारी विभागीय आयुक्त डॉ. विपीन ईटनकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आदींची उपस्थिती होती.

## थोडक्यात

### डंपर खाली येऊन दुचाकीवरील वृद्ध ठार

सोलापूर : छत्रपती रंगभवन चौकाकडून सात रस्ता कडे येणाऱ्या रस्त्यावर नाना नानी बागेच्या जवळ एका डंपरने जोराची धडक दिल्याने दुचाकीस्वार जागीच ठार झाल्याची घटना शुक्रवार दुपारी साडेतीनच्या सुमारास घडली. एम एच १३ उऋ ६८५६ या क्रमांकाच्या डंपर खाली येऊन दुचाकीस्वराचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघातात ठार झालेल्याकडे होंडा डियो चक १३ उथ ३७६९ हे वाहन होते. बाळासाहेब विश्वनाथराव कुलकर्णी असे या अपघातात मरण पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. अपघात झाल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी झाल्याचे पाहायला मिळाले अपघात स्थळे तातडीने पोलीस दाखल झाले त्यांनी मृतदेह शासकीय रुग्णालयात हलवला. पोलिसांनी अपघातग्रस्त डंपर ताब्यात घेतले आहे.

### दोन तोळ्याची चैन पळवली

सोलापूर : दुचाकीवर आलेल्या अज्ञात इसमाने एका महिलेच्या गळ्यातील ७० हजार रुपये किमतीची दोन तोळे वजनाची सोन्याची चैन हिसका मारून चोरून नेल्याची घटना १९ सप्टेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास अंत्रोळीकर नगर वेलनेस मेडिकलच्या बोळात होटगी रोड येथील घराच्या गेट समोर घडली.याप्रकरणी कनिष्का संजय धामेचा (वय-३५,रा.अंत्रोळीकर नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## सीमा सुरक्षा दलाची बस दरीत कोसळली; चार जवानांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : जम्मू-काश्मीरच्या बडगावमध्ये सीमा सुरक्षा दलाच्या जवानांना घेऊन जाणाऱ्या बसचा मोठा अपघात घडला आहे. निवडणुकीसाठी तैनात असलेल्या जवानांना घेऊन जाणारी बस ब्रेल गावातील खोल दरीत कोसळली. बसमध्ये ३६ जवान प्रवास करत होते. यापैकी चार जणांचा मृत्यू झाला असून २८ जण जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. जम्मू-काश्मीरमध्ये १८ सप्टेंबर रोजी पहिल्या टप्प्याचे मतदान संपन्न झाले.

निवडमुकीसाठी जम्मू-काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दुसऱ्या टप्प्याचे मतदान आता २५ सप्टेंबर रोजी होणार आहे. २६ विधानसभा मतदारसंघात होणार असलेल्या मतदानासाठी ३६ जवानांची तुकडी रवाना होत होती. यावेळी बडगाव जिल्ह्यातील ब्रे गावानजीक दरीत कोसळून बसचा अपघात झाला. यावेळी स्थानिकांच्या मदतीने सुरक्षा दलाने बचाव कार्य हाती घेतले. जखमी जवानांना नजीकच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या अपघाताचे अनेक व्हिडीओ आता एक्स या सोशल मिडिया साईटवर व्हायरल होत आहेत. बसचा पूर्ण चेंदामेंदा झाल्याचे या व्हिडीओंमध्ये दिसत आहे.

## तिरुपतीमधील लाडू वाद चिघळला, याचिकेवर बुधवारी सुनावणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अमरावती : तिरुपतीस्थित श्री वेंकटेश्वर मंदिरामध्ये प्रसाद म्हणून वाटप केल्या जाणाऱ्या लाडवांच्या नमुन्यामध्ये निम्न दर्जाचे तूप आणि प्राण्यांची चरबी आढळल्याचे तिरुमला तिरुपती देवस्थानमने (टीटीडी) शुक्रवारी सांगितले. मात्र, आमच्या उत्पादनांचे नमुने संबंधित अधिकाऱ्यांनी उचित प्रकारे प्रमाणित केले आहेत असे उत्तर मंदिराला तुपाचा पुरवठा करणाऱ्या फर्मने दिले. तर, या प्रकरणी नायडू राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांनी केला.

लाडवांच्या निवडलेल्या नमुन्यांमध्ये प्राण्याची चरबी आढळली असे टीटीडीचे कार्यकारी अधिकारी जे श्यामला राव यांनी शुक्रवारी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले. मंदिरामध्ये तुपातील भेसळ ओळखण्यासाठी चाचणी सुविधा नाही आणि त्यासाठी बाहेरील सुविधेचाही वापर केला जात नाही याचा मंदिराला तुपाचा पुरवठा करणाऱ्या पुरवठादाराने फायदा घेतला असा आरोप देवस्थानमने केला आहे. भेसळ चाचणी करणे खर्चिक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या प्रकारे, देवस्थानमने मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केलेल्या आरोपांनी दुजोरा दिला.

या प्रकरणी वायएसआरसीपीचे नेते सुब्बा रेड्डी यांनी आंध्र प्रदेश उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून त्यावर बुधवार, २५ सप्टेंबर रोजी सुनावणी घेण्याचे उच्च न्यायालयाने मान्य केले आहे. या प्रकरणी सत्याचा तपास करावा अशी मागणी रेड्डी यांनी या याचिकेद्वारे केली आहे.

## धनगर आरक्षण आंदोलन; पंढरपुरात दोघांची प्रकृती खालावली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : धनगर समाजास एस टी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, यासाठी येथे सुरू असलेल्या उपोषणाच्या बाराव्या दिवशी दोघांची प्रकृती खालावली आहे. मात्र, त्यांनी रुग्णालयात दाखल होत उपचारास नकार दिल्याने तणाव निर्माण झाला आहे. अखेर या दोघांवर उपोषणस्थळीच उपचार सुरू करण्यात आले आहेत. दरम्यान, या आंदोलनास पाठिंबा म्हणून राज्यभरातून धनगर समाज बांधव पंढरपुरात दाखल होत असल्याने उपोषणस्थळी आज मोठी गर्दी झालेली दिसली. या वेळी उपस्थितांनी आरक्षण मागणीसाठी मोठी घोषणाबाजी केली. धनगर समाजास एस टी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, यासाठी येथे बेमुदत उपोषण सुरू आहे. शुक्रवारी उपोषणाचा बारावा दिवस होता. या उपोषणाला बसलेले यशवंत गायके आणि दीपक बोराडे या दोघांची प्रकृती शुक्रवारी खालावली. मात्र त्यांनी रुग्णालयात दाखल होत उपचार घेण्यास नकार दिल्याने तणाव निर्माण झाला आहे. अखेर बांधवांनी विनंती केल्यावर दोघांवर उपोषणस्थळीच उपचार सुरू करण्यात आले आहेत. या दोघांसह उपोषणास बसलेल्या पाचही आंदोलकांनी आरक्षणाचा लढा सुरू ठेऊ, असा निर्धार व्यक्त केला. दरम्यान, या आंदोलनाला राज्यातून पाठिंबा मिळत आहे. सकाळपासून मोठ्या संख्येने बांधव पारंपरिक ढोल वाजवत, घोंगडी पांघरून उपोषणस्थळी येऊन पाठिंबा देत आहेत.

## जालन्यात बस-टेम्पोचा भीषण अपघात; सहा ठार, १८ जण जखमी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जालना ) मोसंबीची वाहतूक करणारा आयशर टेम्पो व राज्य परिवहन महामंडळाच्या बसमध्ये झालेल्या अपघातात ६ जण ठार तर १८ प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींपैकी ६ जणांची प्रकृती गंभीर आहे. जिल्ह्यातील जालना वडीगोद्री रोडवरील शहापूर गावाजवळ शुक्रवारी सकाळी ८ च्या सुमारास ही घटना घडली.

अपघात एवढा भीषण होता की पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. तसेच दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले असून टेम्पोतील मोसंबी रस्त्यावर विखरून पडली होती. मार्गावरील वाहतूकही प्रभावित झाली होती. महामंडळाची बस बीड जिल्ह्यातील गेवराई येथून जालन्याकडे जात होती तर टेम्पो हा जालन्याहून बीडकडे मोसंबी घेऊन जात होता. दुसऱ्या वाहनाला मागे सारून पुढे जाण्याच्या घाईत समोरून येणाऱ्या बसवर जाऊन आदळल्याने हा अपघात झाला, बस मध्ये एकूण २४ प्रवाशी होते यातील किरकोळ जखमींना अंबड येथील प्राथमिक आरोग्यकेंद्रात उपचारासाठी हलवण्यात आलय. इतर जखमी व मृतांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

## सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात वृद्धावर दुर्मीळ शस्त्रक्रिया यशस्वी

सोलापूर : सोलापूरच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार शासकीय रुग्णालयात एका वृद्ध पुरुष रुग्णावर कठीण आणि दुर्मीळ शस्त्रक्रिया यशस्वीरित्या झाल्याची माहिती डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांनी दिली.

एका ६१ वर्षांच्या पुरुष रुग्णाच्या शरीरामध्ये अधिवृक्क ग्रंथीची गाठ तयार झाली होती. या ग्रंथींना सुप्रारेनल ग्रंथी म्हटले जाते. ग्रंथींची वाढलेल्या गाठीचा (ड्रेनल ग्लैंड ट्युमर) आजार वैद्यकीय क्षेत्रात दुर्मीळ मानला जातो. असा आजार दहा लाख (पान २ वर...)

### जिल्हाधिकारी यांनी दिले आदेश

### माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

## कुरनुर धरण पुर्ण क्षमतेने भरुन खालील आठ बंधारे भरुन द्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : सध्या उजनी धरणातुन एकरुख योजनेच्या माध्यमातून कुरनूर धरणात पाणी सोडले जात आहे.या पाण्याची गती वाढवुन कूरनुर धरण १०० टक्के भरुन धरणाखालील आठ केटीव्हीआर बंधारे भरुन देण्याची मागणी माजी ग्रामविकास राज्यमंत्री सिध्दराम म्हेत्रे यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व अधीक्षक अभियंता भीमा कालवा कार्यालय,सिंचन भवन यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

> दरम्यान शुक्रवारी म्हेत्रे यांनी दिलेल्या निवेदनाची दखल घेत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भीमा कालवा कार्यालयाच्या अधीक्षकांना कुरनूर धरण तात्काळ भरून त्याखालील आठही बंधारे भरून घेण्यासंदर्भात आदेश दिल्याची माहिती माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी दिली.

कुरनूर धरणावर अक्कलकोट तालुक्यातील ५१ गावे व ३ नगरपालिकांचा पाणीपुरवठा अवलंबून आहे.अनेक शेतकऱ्यांनी धरणातून पाइपलाइन नेली आहे. पावसाळा अंतिम टप्प्यात आले असला तरीही दमदार पावसाअभावी तालुक्यातील कोणत्याही प्रकल्पात पाणीसाठा झाला नाही.धरणाखालील आठही बंधारे भरुन दिल्यास आगामी काळात काही अंशी पाणीटंचाईचा प्रश्न मिटण्यास मदत होणार आहे.ही बाब म्हेत्रे यांनी जिल्हाधिकारी यांना सांगितली.

जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी तात्काळ संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी दुरध्वनीद्वारे संपर्क साधला.यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी म्हेत्रे यांना दिले. कुरनुर धरणाखाली अक्कलकोट तालुक्यात सांगवी, बणजगोळ, गौडगाव खु, मिरजगी, रुद्देवाडी, संगोळगी ब, बबलाद, सातनदूधनी हे आठ बंधारे आहेत.

यावेळी म्हेत्रे यांच्यासमवेत अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सिध्दार्थ गायकवाड, मोहन देडे,सोमनाथ चिकलंडे,जटप्पा मुत्तगी आदी उपस्थित होते.




## श्री संत दामाजी कारखान्यावर उद्या माजी आ. प्रशांत परिचारक यांच्या कृतज्ञता सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/ प्रतिनिधी : श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याला राष्ट्रीय सहकार विकास निगम नवी दिल्ली (एनसीडीसी) यांच्याकडून कारखाना उभारणीस पासूनचे इतिहासात प्रथमच रुपये कुठे एवढ्या मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे कामे केलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या कृतज्ञता सत्कार सोहळा आणि भव्य शेतकरी मेळावा व कृषी प्रदर्शनाची आयोजन शनिवार दिनांक २१ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी वाजता कारखाना कार्यस्थळावर केले आहे.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष धनश्री परिवाराचे संस्थापक प्रा शिवाजी काळुंगे भूषणवार असून सदर कार्यक्रमासाठी श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन भगीरथ भालके हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत याशिवाय रतनचंद शहा बँकेचे चेअरमन राहुल शहा कारखान्याचे माजी चेअरमन अँड नंदकुमार पवार जिजामाता पतसंस्थेचे मार्गदर्शक राधाकृष्ण नागणे बळीराजा पसंती चेअरमन दामोदर देशमुख कारखान्याचे माझे व्हाईस चेअरमन रामचंद्र वाकडे तसेच माजी संचालक याचा माळी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असल्याची माहिती कारखान्याची चेअरमन शिवानंद पाटील यांनी दिली. तसेच कारखान्या मार्फत आयोजित केलेल्या या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील व व्हाईट चेअरमन तानाजी खरात यांनी केले आहे.

## संपादकीय....

# प्रसादावरून राजकारण

आंध्र प्रदेशातील तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसादाच्या लाडूंमध्ये जनावरांच्या चरबीचा वापर झाल्याचा गंभीर आरोप आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केला. त्यांच्या या आरोपानंतर मोठी खळबळ उडाली. तिरुपतीस्थित श्री वेंकटेश्वर मंदिरामध्ये प्रसाद म्हणून वाटप केल्या जाणाऱ्या लाडवांच्या नमुन्यामध्ये निम्न दर्जाचे तूप आणि प्राण्यांची चरबी आढळल्याचे तिरुमला तिरुपती देवस्थानमने (टीटीडी) शुक्रवारी सांगितले. मात्र, आमच्या उत्पादनांचे नमुने संबंधित अधिकाऱ्यांनी उचित प्रकारे प्रमाणित केले आहेत असे उत्तर मंदिराला तुपाचा पुरवठा करणाऱ्या फर्मने दिले. तर, या प्रकरणी नायडू राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांनी केला. लाडवांच्या निवडलेल्या नमुन्यांमध्ये प्राण्याची चरबी आढळली असे टीटीडीचे कार्यकारी अधिकारी जे श्यामला राव यांनी शुक्रवारी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले. मंदिरामध्ये तुपातील भेसळ ओळखण्यासाठी चाचणी सुविधा नाही आणि त्यासाठी बाहेरील सुविधेचाही वापर केला जात नाही याचा मंदिराला तुपाचा पुरवठा करणाऱ्या पुरवठादाराने फायदा घेतला असा आरोप देवस्थानमने केला आहे. भेसळ चाचणी करणे खर्चिक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या प्रकारे, देवस्थानमने मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केलेल्या आरोपांनी दुजोरा दिला. या प्रकरणी माजी मुख्यमंत्री आणि वायएसआरसीपीचे अध्यक्ष जगन मोहन रेड्डी यांच्याकडे अंगुलीनिर्देश केला जात असताना, त्यांनी मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्यावर टीका केली आहे. नायडू यांच्या सरकारला १०० दिवस पूर्ण झालेले असून त्यांच्याकडे सांगण्यासारखे काहीही काम नाही, त्यामुळे ते जनतेचे लक्ष भरकटवण्यासाठी हा मुद्दा उपस्थित करत असल्याचा आरोप रेड्डी यांनी केला. केंद्र सरकारने या वादात उडी घेतली असून, केंद्रीय आरोग्यमंत्री जे पी नड्डा यांनी या प्रकरणी आंध्र प्रदेश सरकारकडून अहवाल मागितला आहे. या प्रकरणी वायएसआरसीपीचे नेते सुब्बा रेड्डी यांनी आंध्र प्रदेश उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून त्यावर बुधवार, २५ सप्टेंबर रोजी सुनावणी घेण्याचे उच्च न्यायालयाने मान्य केले आहे. या प्रकरणी सत्याचा तपास करावा अशी मागणी नुकतीच रेड्डी यांनी या याचिकेद्वारे केली आहे.

# आंतरराष्ट्रीय शांतता दिवस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दरवर्षी २१ सप्टेंबर रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय शांतता दिवस साजरा केला जातो. दोन दशकांनंतर २००१ मध्ये महासभेने हा दिवस १९८१ मध्ये एकमताने संयुक्त राष्ट्रसंघाच्या ठराव ३६/३७ द्वारे स्थापित जनरल असेंब्लीने हा दिवस सर्व राष्ट्रे आणि लोकांमध्ये आणि शांततेच्या आदर्शांचे स्मरण आणि २४ तास अहिंसा आणि युद्धविराम पाळण्याद्वारे शांततेच्या आदर्शांना बळकट करण्यासाठी समर्पित दिवस म्हणून आंतरराष्ट्रीय शांतता दिवस घोषित केले आणि सप्टेंबर १९८२ मध्ये पहिल्यांदा साजरा केला गेला आणि अनेक राष्ट्रे, राजकीय गट, लष्करी गट आणि लोक पाळतात. अहिंसा आणि युद्धविरामाचा कालावधी म्हणून नियुक्त करण्यासाठी मतदान केले. सोप्या भाषेत सांगायचे तर, त्यात राहणाऱ्या प्रत्येकासाठी अधिक शांततापूर्ण जग निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. शांतता आपल्या जीवनाच्या जवळजवळ प्रत्येक पैलूवर परिणाम करते. जागतिक शांतता ही पृथ्वीवरील सर्व लोक आणि राष्ट्रांमध्ये आणि त्यांच्यामध्ये शांततेच्या आदर्श स्थितीची संकल्पना आहे. दलाई लामा यांनी ते चांगले सांगितले: जागतिक शांतता आंतरिक शांततेतून विकसित झाली पाहिजे. शांतता म्हणजे केवळ हिंसाचाराचा अभाव नाही. माझ्या मते शांतता ही मानवी करुणेचे प्रकटीकरण आहे.

वेगवेगळ्या संस्कृती, धर्म, तत्त्वज्ञान आणि संघटनांमध्ये असे राज्य कसे निर्माण होईल, याबद्दल वेगवेगळ्या संकल्पना आहेत. विविध धार्मिक आणि धर्मनिरपेक्ष संघटनांचे मानवी हक्क, तंत्रज्ञान, शिक्षण, अभियांत्रिकी, वैद्यक किंवा मुत्सद्देगिरी या सर्व प्रकारच्या लढाईचा अंत करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मुत्सद्देगिरीला संबोधित करून जागतिक शांतता प्राप्त करण्याचे उद्दिष्ट आहे. १९४५ पासून युनायटेड नेशन्स आणि त्याच्या सुरक्षा परिषदेचे पाच स्थायी सदस्य (चीन, फ्रान्स, रशिया, युनायटेड किंगडम आणि युनायटेड स्टेट्स) युद्धाशिवाय संघर्षांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने कार्यरत आहेत. तरीही तेव्हापासून राष्ट्रांनी अनेक लष्करी संघर्षात प्रवेश केला आहे.

शांतता बळजबरीने राखली जाऊ शकत नाही; ती केवळ समजूतदारपणानेच मिळवता येते. शांतता म्हणजे संघर्षाची अनुपस्थिती नाही, ती शांततापूर्ण मार्गाने संघर्ष हाताळण्याची क्षमता आहे. स्वतःला हाताळण्यासाठी, आपले डोके वापरा; इतरांना हाताळण्यासाठी, आपले हृदय वापरा. शत्रुत्व आणि हिंसाचार नसतानाही शांतता ही सामाजिक मैत्री आणि सौहार्दाची संकल्पना आहे. सामाजिक अर्थाने, शांतता म्हणजे सामान्यतः संघर्षाचा अभाव (जसे की युद्ध) आणि व्यक्ती किंवा गटांमधील हिंसाचाराच्या भीतीपासून मुक्तता. संपूर्ण इतिहासात नेत्यांनी वर्तनात्मक संयम स्थापित करण्यासाठी शांतता आणि मुत्सद्देगिरीचा वापर केला आहे, ज्यामुळे विविध प्रकारचे करार किंवा शांतता कराराद्वारे प्रादेशिक शांतता किंवा आर्थिक वाढीची स्थापना झाली आहे. अशा वर्तणुकीवरील संयमामुळे अनेकदा संघर्ष कमी झाला, आर्थिक परस्परसंवाद वाढला आणि परिणामी भरभराट झाली.

मानसिक शांतता (जसे की शांततापूर्ण विचार आणि भावना) कदाचित कमी चांगल्या प्रकारे परिभाषित केले जाते, तरीही वर्तणुकीशी शांतता स्थापित करण्यासाठी एक आवश्यक अग्रदूत आहे. शांततापूर्ण वर्तन कधीकधी शांततापूर्ण आंतरिक स्वभाव मुळे होते. दैनंदिन जीवनातील अनिश्चिततेवर अवलंबून नसलेल्या आंतरिक शांततेच्या विशिष्ट गुणवत्तेने शांततेची सुरुवात केली जाऊ शकते. स्वतः साठी आणि इतरांसाठी अशा शांततापूर्ण अंतर्गत स्वभाव चे संपादन अन्यथा परस्परविरोधी हितसंबंधांचे निराकरण करण्यात योगदान देऊ शकते. शांतता सहसा उत्साहाच्या स्थितीत नसते, जरी आपण उत्साही असताना आनंदी असतो, परंतु शांतता असते जेव्हा एखाद्याचे मन शांत आणि समाधानी असते. शांतता, सुरक्षा, भविष्य: मूलभूत गरजा ज्या हिंसक संघर्षाच्या दरम्यान असलेल्या लोकांना हव्या असतात आणि शोधतात. तथापि, विश्वास, उपजीविका, संस्था आणि नातेसंबंध परत निर्माण करणे हे एक जटिल आणि दीर्घकालीन प्रयत्न आहे, जे पुढे आणि मागे पावले भरलेले आहे. शांतता प्रस्थापित करण्याचे हे कार्य आहे. प्रत्येकाला सुरक्षित आणि आनंदी जीवनाचा अधिकार आहे, परंतु जगभरातील लाखो लोक युद्ध आणि हिंसाचारामुळे त्रस्त आहेत.

आंतरराष्ट्रीय शांतता दिवस ज्याला अधिकृतपणे जागतिक शांतता दिवस म्हणून देखील ओळखले जाते. ही संयुक्त राष्ट्रांनी मंजूर केलेली सुट्टी आहे जी दरवर्षी २१ सप्टेंबर रोजी पाळली जाते. हे जागतिक शांततेसाठी समर्पित आहे आणि विशेषत: युध्द आणि हिंसेची अनुपस्थिती, जसे की मानवतावादी मदत प्रवेशासाठी लढाऊ क्षेत्रामध्ये तात्पुरती युद्धविराम होऊ शकते. या दिवसाचे उद्घाटन करण्यासाठी, संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांततेची घंटा न्यूयॉर्क शहरात वाजवली जाते. ही घंटा आफ्रिका वगळता सर्व खंडांतील लोकांनी दान केलेल्या नाण्यांमधून टाकली जाते आणि युद्धाच्या मानवी खर्चाचे स्मरण म्हणून जपानच्या संयुक्त राष्ट्र संघाने दिलेली भेट होती; त्याच्या बाजूला संपूर्ण विश्व शांतता दीर्घायुषी राहो असा शिलालेख लिहिलेला आहे. हाच एक दिवस आहे जेव्हा आपण प्रत्येकासाठी अधिक शांततापूर्ण जग बनवण्याचा प्रयत्न करतो.

युनेस्कोच्या व्हिएतनामच्या संचालिका कॅथरीन मुलर यांनी ग्लोबल एज्युकेशन मॅगझिनमध्ये म्हटले आहे, मी वैयक्तिकरित्या युनेस्कोच्या मूल्यांशी ओळखतो या अर्थाने की मला खरोखर विश्वास आहे की शिक्षण, संस्कृती, सामाजिक आणि नैसर्गिक विज्ञान आणि दळणवळण आणि माहिती ही शाश्वत विकासासाठी काही सर्वात शक्तिशाली चालक आहेत आणि शांतता, शाश्वत शांतते शिवाय शाश्वत भविष्य असू शकत नाही, जागरुकता वाढवणे, क्षमता निर्माण करणे, विविधते बद्दल समज आणि आदर वाढवणे आणि शांततेची संस्कृती सुनिश्चित करण्याचे मार्ग शोधण्यासाठी परस्पर संवादाच्या संधींना प्रोत्साहन देणे या सर्व कृती आहेत ज्या लोकांना स्वारस्य निर्माण करण्यास प्रवृत्त करतात.

शांतता ही सुरक्षा आणि शांततेची तणावमुक्त अवस्था आहे जी कोणतीही लढाई किंवा युद्ध नसताना येते, सर्वकाही परिपूर्ण सुसंवाद आणि स्वातंत्र्यात एकत्र असते.



जागतिक शांतता ही हिंसाविरहित जगाची कल्पना आहे, जिथे राष्ट्रे एकमेकांसोबत काम करण्याचा प्रयत्न करतात. जागतिक शांततेचा अर्थ समान मानवी हक्क, तंत्रज्ञान, प्रत्येकासाठी मोफत शिक्षण, अभियांत्रिकी, औषधांची उपलब्धता, मुत्सद्दी किंवा सर्व प्रकारच्या लढाईचा अंत असू शकतो.

शांत, शांत, शांत आणि शांत असे काही सामान्य समानार्थी शब्द आहेत. या सर्व शब्दांचा अर्थ शांत आणि गडबडीपासून मुक्त असा होतो, तर शांतता म्हणजे भांडण किंवा अशांतता याच्या उलट किंवा नंतरच्या शांततेची स्थिती. कोणत्या संदर्भात शांतता शांततेची जागा घेऊ शकते? हे सर्व मानवी हक्कांच्या प्राप्तीसाठी एक आवश्यक घटक आहे. शांतता हे मानवी हक्कांचे उत्पादन आहे: एखादा समाज आपल्या लोकांच्या मानवी हक्कांना जितका अधिक प्रोत्साहन देतो, संरक्षित करतो आणि पूर्ण करतो, तितकी हिंसा रोखण्याची आणि संघर्ष शांततेने सोडवण्याची शक्यता जास्त असते. अगदी सामान्य नात्यातही आपण हे पाहू शकतो की जर जोडप्याने ते शांत आहेत असे म्हटले तर याचा अर्थ ते भांडत नाहीत. पण प्रेम असेल तर भावनांची गतिशील देवाणघेवाण होते; प्रेम स्थिर नसते. शांती म्हणजे दु:खाचे खंडन आहे ; प्रेम ही हृदयाची सकारात्मक अभिव्यक्ती आहे.

आपल्या समाजाचे नुकसान करणाऱ्या वाईट गोष्टींवर नियंत्रण ठेवण्यासाठी शांतता आवश्यक आहे. हे उघड आहे की आपण अनेक पातळ्यांवर संकटांचा सामना करत राहू परंतु शांततेच्या मदतीने आपण त्यांचे अधिक चांगले व्यवस्थापन करू शकतो. शिवाय, मानवजातीसाठी जगण्यासाठी आणि चांगल्या भविष्यासाठी प्रयत्न करण्यासाठी शांतता आवश्यक आहे. जागरूकता कृती निर्माण करते आणि कृती जीव वाचवते! शांतता दिनाचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवणे हेच 'पीस वन डे' चे ध्येय आहे. शांतीची संस्कृती जोपासणे या वर्षाची आंतरराष्ट्रीय शांतता दिनाची थीम आहे तसेच या वर्षी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने शांततेच्या संस्कृतीवर घोषणा आणि कृती कार्यक्रम स्वीकारल्याचा २५ वा वर्धापन दिन आहे. चला अशा जगासाठी हात जोडू या जिथे विविधता साजरी केली जाते आणि समज हीच भाषा बनते जी आपल्या सर्वांना एकत्र करते. या शुभ दिनी सीमा, वंश आणि धर्म यांच्या पलीकडे असलेल्या जागतिक सौहार्दासाठी प्रयत्न करू या. सर्वांना जागतिक शांतता आणि समज दिनाच्या शुभेच्छा !

**– प्रविण बागडे नागपूर**
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
ई-मेल : pravinbagde@gmail.com

### कामगारांवर गुलामगिरीची बंधने लादणे हे लोकशाहीचे विडंबन होय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# फुले शाहू आंबेडकर राईट स्टडी सर्कलच्या वतीने ६५ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : आपण सर्वांना ज्ञात आहेच की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १५ सप्टेंबर १९३८ ला काँग्रेस सरकारने कायदेमंडळात आणलेल्या कामगारांच्या नागरिक स्वातंत्र्यास विघातक अशा ट्रेड डिस्प्युट बिलावर चर्चा करीत असताना म्हटले की, कामगारांवर गुलामगिरीची बंधने लादणे हे लोकशाहीचे विडंबन होय. म्हणून संदर्भीय ऐतिहासिक विधानाच्या ८६ व्या वर्धापनदिनानिमित्त सद्यस्थितीवर विचारमंथन व्हावे म्हणून सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन (खछ : आईना) च्या संयुक्त विद्यमाने ६५ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे १५ सप्टेंबर २०२४ ला फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना एड. अभय टाकसाळ म्हणाले की, विचाराविना केलेली कृती आंधळी आणि वांझोटी असते. विचारांशिवाय माणूस पशू समान असतो. ज्यांना राजकारणांशी काही देणे घेणे नाही अशी म्हणणारी माणसं एकतर धूर्त किंवा भोळी असतात. जन्माला येणाऱ्या बाळाला सुद्धा कायदा लागू असतो. त्यांच्या उत्कर्षासाठी आंगणवाड्या बालवाड्यांची निर्मिती करण्यात आली आहे. हे सर्व राजकारणामुळे मिळालेले आहे. पण काय मिळाले नाही? हे पण तपासले पाहिजे. प्रत्येक जाती धर्मात कामगार असून त्यांची संख्या ९९ टक्के आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या माणसांना शहराकडे चला असे म्हणाले होते, जेणेकरून अस्पृश्यतेचे चटके कमी सहन करावे लागतील. सोव्हियेत रशियात कामगारांचे राज्य असताना त्यांनी आपणास विविध क्षेत्रात मदत केली आहे. मिखाईल गोर्बाचेव नंतर ते राष्ट्र कोसळले आणि आता तेथे केवळ ब्लॉदिमीर पुतीनच निवडून येतात. अटल बिहारी बाजपेयी यांनी कलम ४५ प्रमाणे मिळालेला शिक्षणाचा घटनादत्त अधिकार काढून घेतला आहे. ज्यामुळे आपला देश धोक्यात आला असून अनेक कायदे नावालाच राहिले आहेत. २०१४ ला आलेल्या सरकारने आंबेडकर पेरियार स्टडी सर्कल वर बंदी आणली. संशोधक रोहीत वेम्युला यांची हत्या घडवून आणली. कामगारांना किमान वेतन मिळण्याचा कायदा कागदोपत्रीच राहिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते ब्राह्मणशाही व भांडवलशाही हे कष्टक-यांचे दोन शत्रू आहेत. जेव्हा आम्ही शाळेबाहेर होतो, तेव्हा ते शाळेत होते. तर आम्ही शाळेत गेलो तेव्हा ते विद्यापीठात गेले. अशा कालबाह्य भागात प्रवेश करून चालणार नाही. ब्राह्मणवाद जोपासणा-या व्यवस्थेला विरोध केला पाहिजे. गॅट करार, खाऊजा धोरण स्वीकारल्याने नफ्यातील उद्योग धंदे सुद्धा विकण्यात आले. कामाचे तास वाढविणे, ठराविक पगारावर कामगारांना राबवून घेणे, संघटीत होण्यावर, संप करण्यावर बंदी आनने, इत्यादी कायदेशीर बदल करून कामगारांसाठी असलेल्या कायद्यांचे होत्याचे नव्हते करण्यात आले. उत्तर भारतातील शेतकरी सरकारला जेरीस आणू शकतात तर सर्व क्षेत्रातील कामगार का एकत्रित येऊ शकत नाहीत?



याप्रसंगी एड. विलास रामटेके म्हणाले की, कामगारांना संपाचा अधिकार मिळावा यासाठी झालेल्या चर्चेतील हे विधान आहे. ज्यात तो त्यांचा अधिकार असून ते कट असू शकत नाही. हे सिद्ध करण्यात आले. महादेव डांबरे म्हणाले की, इंग्रज आपले नाहीत हे मान्य केले तरी ज्यांना आपले म्हणावे ते कामगारांवर जाचक अटी का लादतात? हे मात्र अनाकलनीय आहे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या वर्तमानपत्राच्या सर्व संपादकांचे व त्यांच्या समूहाचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो, ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्या प्रकाशित केल्या आहेत. आजच्या लोकमत या दैनिकात एक ठळक बातमी आहे ती अशी की जगात ९५ टक्के लोक आजारी आहेत. ही मानवीय समाजासाठी फारच चिंताजनक बाब आहे. कामगारांच्या अनुषंगाने विचार करता देशात ३ कोटींच्या आसपास नोकरदार वर्ग आहे. तर मग उर्वरित नागरिकांना रोजगार, नौक-या कशा उपलब्ध होऊ शकतील? हा आपल्या समोरील गंभीर प्रश्न आहे. एका काळात भाजपचे वरिष्ठ नेते म्हणायचे आरक्षणाची तरतूद कायम ठेवून ते निष्प्रभ करण्यात येईल. त्याची ते अंमलबजावणी करीत असल्याने आरक्षणाचा अनुशेष भरून न काढता लॅटरल पद्धतीने पद भरती केली जाते. तसेच नफ्यातील पब्लिक सेक्टर व उद्योगधंद्याचे कवडी मोल भावाने विक्री करून खाजगीकरण केले जात असल्याने आरक्षणाच्या अनुशेषाचा प्रश्न अप्रत्यक्षपणे निकालात काढल्या जात आहे. अशाप्रकारे खाजगीकरणाने मानवीय मूल्यांचे अवमूल्यन होत आहे. करार पद्धतीने कामगार, नोकरभरती करणे ही एक प्रकारची लुटच आहे. सामान्य माणसाच्या बँकेतील पैशाचा कर्ज रुपाने वापर करून भांडवलदार, उद्योगपती सरकारी मालमत्ता, उद्योगधंदे कवडीमोल भावाने विकत घेऊन कामगारांचा कांन्ट्रॅक्ट पद्धतीने वापर करून शोषण करतात. एवढेच नव्हे तर त्यांनी ताब्यात घेतलेले उद्योगधंदे दिवाळखोरीत काढून कामगारांना देशोधडीला लावतात. असे अनेक उद्योगपती आहेत ज्यांनी ज्यांनी लाखो कोटी रुपये बँकांचे कर्ज बुडविलेली आहेत. तेव्हा यांचा सिबिल स्कोअर पाहणारी यंत्रणा कुठे असते? येथे मात्र थोड्या कर्जासाठी शेतकरी कामगारांना आत्महत्या करावी लागते. करिता १५ सप्टेंबर १९३८ ला काँग्रेस सरकारने मुंबई कायदेमंडळात आणलेल्या कामगारांच्या नागरिक स्वातंत्र्यास विघातक अशा ट्रेड डिस्प्युट बिलावर चर्चा करीत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कामगारांवर गुलामगिरीची बंधने लादणे हे लोकशाहीचे विडंबन होय. हे १९३४ च्या संप बंदी कायद्यात सुधारणा करण्याच्या अनुषंगाने सादर करण्यात आलेले बील होते. ज्यात ऐच्छिक तडजोड ही सक्तीची करण्यात येणार होती. तसेच 'द इंडियन फेडरेशन ऑफ लेबर' या संस्थेच्या विद्यमाने ८ ते १७ सप्टेंबर दरम्यान दिल्ली येथे आयोजित 'द ऑल इंडिया ट्रेड युनियन्स वर्क्स स्टडी' कॅम्पच्या समारोपिय सत्रात मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, शासन यंत्रणेचा ताबा घेणे हे कामगारांचे ध्येय असावे. हे लक्षात घेऊन वर्तमानात सरकारने ४४ कामगार कायद्यांचे ४ कायद्यात रुपांतर केल्याने कामगार तरतुदीच्या अनुषंगाने आपण काय कमावले आणि काय गमावले? याची जाणीव व्हावी म्हणून जाणीवपूर्वक सदरील विषयावर चर्चा आयोजित केली आहे. या कार्यशाळेचे सुत्रसंचालन महादेव डांबरे यांनी केले. या कार्यशाळेला देवकांत मेश्राम, एड. विलास रामटेके, कॉं. राजू हिवराळे, दिलीप मेश्राम, सम्यक विलास रामटेके, साधू आनंद, कॉं. एड. अभय टाकसाळ, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे महादेव डांबरे यांच्या आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

# मराठवाडा मुक्ती संग्रामदिन महाराष्ट्राच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा व गौरवशाली दिवस आहे : राणा पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**नळदुर्ग : (दादासाहेब बनसोडे )**

मराठवाडा मुक्ती संग्रामदिन निजामाच्या जुलमी अन्यायाविरुद्ध भारतीय सैन्याने लढा उभा केला १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र्य झाला पण मराठवाडा मात्र निजामाच्या ताब्यात होता भारतीय सैनिकांनी निजामा विरुद्ध खुप मोठा संग्राम सुरू केला बचित्तरसिंग व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वःताच्या छातीवर गोळ्या घेत आपली लढाई सुरुच ठेवली आणि निजामाच्या सैनिकांना पळवुन लावले आणि बचित्तरसिंग नळदुर्ग आलियाबाद येथे ऐतिहासिक पुलात शहीद झाले १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा प्रदेश हैद्राबाद निजामाच्या ताब्यातून मुक्त झाला याचा खुप मोठा इतिहास आहे हा इतिहास व शहीद बचित्तरसिंग यांचे कार्य कधी ही विसरता कामा नये कारण शहीद बचित्तरसिंग

### नळदुर्ग येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठया उत्साहात साजरा

आपल्यासाठी खुप मोठी प्रेरणा आहेत यांच्या त्या शूर आठवणी आपण कधीही विसरू शकत नाही म्हणून शहीद बचित्तरसिंग व स्वतंत्र सैनिकांचे खुप मोठे स्मारक नळदुर्ग अलियाबाद येथे होणार आहे आसे परखड मत तुळजापूर तालुक्याचे लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केले . प्रथमता शहीद बचित्तरसिंग यांच्या प्रतिमेचं पुष्पहार घालून पूजन करण्यात आले यावेळी सर्वांनी अभिवादन केले व मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला .



नळदुर्ग येथील नगर परिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण केले याच बरोबर शहरांमध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून नळदुर्ग येथील ऐतिहासिक किल्ल्यात तुळजापूरचे नायब तहसीलदार संतोष पाटील मंडळ अधिकारी कुंभार तर हुतात्मा स्मारकात तुळजापूर तहसीलच्या पेशकर श्रीमती भोगे यांच्या हस्ते तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले तर जिल्हा परिषद कन्या प्रशाला नळदुर्ग येथे मुख्याध्यापक कमलाकर गायकवाड यांनी केले तर डॉ आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलचा नर्सरीचा विद्यार्थी मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या निमित्ताने इंग्लिश मधून आपलं स्पष्ट मनोगत व्यक्त केला जिल्हा परिषद कन्या प्रशाला येथील मुलीने राष्ट्रगीत सादर केले शिवाय नळदुर्ग पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ईश्वर नांगरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी तिरंगा ध्वजास सलामी दिली

यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक स्वतंत्र सैनिकाचे पुत्र उपस्थित होते .

यावेळी भाजपाचे नेते सुशांत भूमकर ,शहराध्यक्ष भिमाजी घुगे पद्माकर घोडके बबन चौधरी, रणजीतसिंह ठाकुर, स्वातंत्र सैनिक पुत्र देवानंद बनसोडे, श्रमिक पोतदार, विलास राठोड, संजय विठ्ठल जाधव , पत्रकार विलास येडगे, पत्रकार दादासाहेब बनसोडे सह नळदुर्ग शहरातील माजी सैनिकांनी तिरंगा ध्वजास सलामी दिली .यावेळी गावातील सर्व नागरिक महिला व विद्यार्थी उपस्थित होते.

# सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात वृद्धावर दुर्मीळ शस्त्रक्रिया यशस्वी

(पान १ वरून...) व्यक्तींपैकी दोन ते आठ व्यक्तींना होतो. शरीरातील दोन्ही मूत्रपिंडांच्या वरच्या बाजूला असलेल्या लहान, त्रिकोणी आकाराच्या अधिवृक्क ग्रंथी संप्रेरके तयार करतात. यातून शरीराचे चयापचय, व रोगप्रतिकारक शक्ती, रक्तदाब, तणावाला प्रतिसाद आणि इतर आवश्यक कार्ये नियंत्रित करण्यास मदत करतात. परंतु अधिवृक्क ग्रंथीची गाठ (ड्रेनल ग्लैंड ट्युमर) हा आजार दुर्मीळ मानला जातो. या ग्रंथीतून विविध संप्रेरके स्त्रवली जातात. यामुळे रुग्णाचा रक्तदाब वाढतो डोके दुखणे, चक्कर करणे, मळमळ होणे, छातीत धडधड करणे अशी लक्षणे दिसून येतात. याशिवाय पोटदुखी आणि अशक्तपणा येतो. यावर शस्त्रक्रिया करणे आव्हानात्मक असते. विशेषतः अत्याधुनिक दुर्बिणीद्वारे या शस्त्रक्रिया करणे जास्त कठीण मानले जाते.

छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार शासकीय रुग्णालयात अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांच्यासह डॉ. संचित खरे, डॉ. अमेय ठाकूर, डॉ. अलिशा माथूर यांच्या पथकाने संबंधित रुग्णावर यशस्वीपणे शस्त्रक्रिया केली. डॉ. नीलांबरी अडके, डॉ. मंजिरी देशपांडे व डॉ. सागर गुंडे या भूलतज्ज्ञांनी आपली जबाबदारी सांभाळली. रुग्णाची प्रकृती उत्तम असून त्याचा त्रास कमी झाल्याचा दावा अधिष्ठाता डॉ. ठाकूर यांनी केला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## गुन्हेगारी जगत...

### सिद्धेश्वर मंदिरासमोरून दुचाकी लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) सिद्धेश्वर मंदिर समोर हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीएफ.७९६८ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १० सप्टेंबर रोजी घडली. याप्रकरणी परमेश्वर तुप्पद (वय-२६,रा.हंद्राळ,पो.करजगी,ता. अक्कलकोट यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार पाडवी हे करीत आहेत.

### घराच्या गेटचे कुलूप तोडून चोरी करण्याचा प्रयत्न

सोलापूर (प्रतिनिधी) घराच्या गेटचे कुलूप तोडून हॉलचा दरवाजा उचकटून अज्ञात चोरट्याने घरातील कपाटाच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेली रक्कम चोरून नेल्याचा प्रयत्न केल्याची घटना १५ ते १६ सप्टेंबर दरम्यान रंगराज नगर गोंधळे वस्ती येथे घडली.याप्रकरणी श्रीनिवास नारायण बत्तीन (वय-३९,रा.साखरपेठ) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार भांगे हे करीत आहेत.

### दारू, मावासाठी पैसे न दिल्याने डोक्यात घातला दगड

सोलापूर (प्रतिनिधी) दारू पिण्यासाठी व मावा खाण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्याने तरुणास शिवीगाळ करत गच्ची पकडून मारहाण केली.त्यानंतर दगड उचलून डोक्यात मारून जखमी केल्याची घटना १६ सप्टेंबर रोजी सम्राट चौक येथे घडली.याप्रकरणी सिद्धार्थ नागसेन नागटिळक (वय-३३- ,रा.न्यू बुधवार पेठ आनंदनगर,आंबेडकर उद्यान समोर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून विकी विनायक भंडारे (रा. राहुल चौक उद्यानसमोर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार शेख हे करीत आहेत.

### हॅण्डल लॉक केलेली दुचाकी पळवली

सोलापूर (प्रतिनिधी) हॅण्डल लॉक केलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३. सीजी.२१७९ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १४ सप्टेंबर रोजी रेल्वे स्टेशन जवळ घडली. याप्रकरणी ओमकार अजय सुतार (वय-२८,रा.राजेश्वरी नगर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोह. फुटाणे हे करीत आहेत.

### वन्य प्राण्यांचे मास जवळ बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल

सोलापूर (प्रतिनिधी) विनापरवाना व बेकायदेशीरपणे दोन काळवीट जातीच्या हरणाचे मांस विक्री करिता व तसेच जवळ बाळगलेल्या स्थितीत मिळून आल्याची फिर्याद पोलीस कॉन्स्टेबल भारत पाटील (नेमणूक गुन्हे शाखा,सोलापूर शहर) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून गुलाब उर्फ सुभाष आबाशा भोसले (वय-४८,रा.१६ संडासजवळ,लिमयेवाडी,येथे भाड्याने,मुळ-खानापूर,ता.तुळजापूर,जिल्हा धाराशिव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# माणदेशी रत्न सचिन खिलारी हा भारत देशाचा अभिमान व स्वाभिमान : अध्यक्ष शिवाजीराव शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/वरकुटे मलवडी :

पॅरिस मध्ये ४ सप्टेंबर २०२४रोजी झालेल्या पॅराओलंपिक MENS SHUT PUT F46 या स्पर्धेमध्ये सांगली येथील आटपाडी तालुक्यातील करगणी गावचे सुपुत्र आणि लोणारी समाजाचे उत्तम खेळाडू ओलंपिक वीर सचिन भाऊ खिलारी यांनी भारतासाठी सिल्वर मेडल मिळवून दिले आणि त्यांची जिल्हा मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली याचा आम्हा सर्वांना माण तालुक्यासह प्रत्येक भारतीयांना सार्थ अभिमान आहे असे प्रतिपादन भाजपा तालुकाध्यक्ष श्री शिवाजीराव शिंदे यांनी केले.




शिंदे पुढे म्हणाले की सचिन खिलारी यांनी केलेल्या कामगिरीबद्दल बोलत असताना सचिनचा प्रवास हा एक दिवसाचा नसून तो २००९ सालापासून मेहनत घेत आहे त्याला यश २०२४ सर्वात मोठे यश मिळाले याचा आनंद आहे. त्याचे भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या देशात आल्यानंतर स्वागत आणि अभिनंदन केले तोंडभरून कौतुक केले आणि एवढेच नाही तर त्यांची महाराष्ट्र सरकारने जिल्हा मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी म्हणून निवड ही केली या खेळामध्ये भारताला ५५ वर्षानंतर हे पदक मिळते आहे म्हणून हा भारताचा स्वाभिमान आणि अभिमान आहे ही निवड म्हणजे भारताच्या तिरंग्याचा विजय आहे. हे यश लोणारी समाजातील युवकासह सबंध लोकांना प्रेरणादायी गोष्ट आहे . यांची नियुक्ती फक्त क्रीडा क्षेत्रात करतात ही खंत आहे परंतु तसे न करता यांना प्रशासन क्षेत्रात म्हणजे उपजिल्हाधिकारी, उप मुख्य कार्यकारी, अधिकारी उपअधीक्षक अश्या पदावर यांची नियुक्ती करण्यासाठी मी स्वतः पाठपुरावा मां मंत्री महोदय कडे याबाबतीत करतो. कुरणेवाडी तील समाजाची तळमळ असणारी युवकांनी पुढाकार घेऊन प्रथम सचिन भाऊ खिलारी आणि नव्याने पोलिस उप निरीक्षक पदी नियुक्त झालेले करगनी

**कुरणेवाडीत गजराज कला क्रीडा व सांस्कृतिक मंडळ व ग्रामस्थ यांच्या वतीने सत्कार समारंभ**

गावचे समाधान खिलारी यांची गावातुन जंगी मिरवणूक काढून स्वागत आणि अभिनंदन करण्यात आले . या सत्कार संभारंभ प्रसंगी मी युवकांना संदेश देऊ इच्छितो की कठोर परिश्रम जिद्द चिकाटी आणि मेहनत करून आपण कोणत्याही पदाला गवसणी घालू शकतो असे ज्वलंत उदाहरण या तुमच्यासमोर दोन सत्कार मूर्ती आहेत याची प्रेरणा घेऊन युवकांनी कामाला लागावे असे उदगार काढले.

यावेळी कार्यक्रमासाठी वन परिक्षेत्र अधिकारी नितीन आटपाडकर वनपाल श्रीमंत खिलारी, प्रा सचिन होनमाने रामभाऊ नरळे साहेब, मोहन शेट कदम सरपंच प्रकाश खिलारी, धनाजी कदम, हिंदुराव खिलारी,पितांबर आटपाडकर, कुबेर आटपाडकर, बाबाराजे हुलगे, बाबा आटपाडकर, वजीर खाडे सर,अजय आटपाडकर फौजी इत्यादीसह पंचक्रोशितील इतर मान्यवर उपस्थित होते व पोपट आटपाडकर, प्रशांत आटपाडकर, नाथा आटपाडकर ,किरण आटपाडकर, गणेश आटपाडकर , नवनाथ आटपाडकर,ऋषी आटपाडकर, महेश आटपाडकर यशवंत आटपाडकर, तुषार आटपाडकर,अक्षय आटपाडकर, विशाल आटपाडकर यांच्यासह मंडळातील इतर सर्व कार्यकर्ते यांनी कार्यक्रमाचे योग्य नियोजन केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा काशिनाथ आटपाडकर यांनी केले.

## दोन दलित युवकांना किरकोळ कारणावरुन बेदम लोखंडी रॉड ने मारहाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील बिगवन येथे मंगळवार दिनांक १७ रोजी रात्री दहाच्या सुमारास दोन दलित युवकांना २८ जणांच्या जमावाकडून बेदम मारहाण करण्याचा प्रकार इंदापूर तालुक्यातील भिगवण येथे घडला आहे.

सदर घटनेमध्ये दोन युवक गंभीर जखमी झाले असून भिगवण मध्ये दुसऱ्या दिवशी दिवसभर तणावाचे वातावरण झाले होते. भिगवण पोलिसांनी ग्रामपंचायत सदस्यासह २८ जणांवर ट्रॉसिटी कायद्यांतर्गत व इतर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

**ग्रामपंचायत सदस्यासह २८ जणांवर ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल**




सदर घटनेतील आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी अमर बौद्ध युवक संघटनेकडून आज दिनांक १९ रोजी भिगवन बंद चे आवाहन केले आहे. सदर घटनेत सिद्धेश तानाजी शेलार व अर्जुन गणेश शेलार (रा. भिगवण ता. इंदापूर) हे दोघे जखमी झाले आहेत. सिद्धेश शेलार याच्या फिर्यादीवरून भिगवण पोलिसांनी ग्रामपंचायत सदस्य अमितकुमार वाघ यांच्यासह अक्षय भरणे, अमोल वाघ, अतुल गाडे, रोहित गाडे, साहिल गाडे, विजय गुणवरे, अजय गुणवरे, अंकुश गाडे, राहुल गाडे, रोहित भरणे, बाळा भरणे, ऋतिक चव्हाण (गुणवरे), सनी जाधव, विशाल गाडे, भावेश धवडे (सर्व रा. भिगवण) यांच्यासह इतर अनोळखी दहा ते बारा जनाविरुद्ध ट्रॉसिटी कायद्यांतर्गत तसेच बेकायदेशीर जमाव जमवणे, गंभीर स्वरूपाच्या जखमा करणे, जातिवाचक बोलून शिवीगाळ करणे आधी कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

सविस्तर माहिती अशी की, सिद्धेश शेलार व अर्जुन शेलार हे दुचाकीवरून जारच्या बाटलीतून पाणी आणण्यासाठी मंगळवारी रात्री दहाच्या सुमारास भिगवण येथील विरांश चौकातील एका पाण्याच्या दुकानात गेले होते. पाणी घेऊन परत श्रीनाथ चौकातून निघाले असता तेथे दारू पिऊन नाचत असणाऱ्यास त्यांच्या दुचाकीचा धक्का लागल्यावरून बाचाबाची होऊन जमावाने सिद्धेश शेलार व अर्जुन शेलार यांना जातीवाचक शिवीगाळ करीत लाथा- बुक्क्यांनी तसेच लोखंडी गज, लाकडीने बेदम मारहाण केली. या घटनेत ते दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## नेहरू हॉकी स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कूलला विजतेपद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर व क्रीडा संचलनालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने १७ वर्षाखालील जिल्हास्तरीय नेहरू हॉकी स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कूल ने विजेतेपद पटकाविले.




१७ वर्षा खालील गटातील सामन्यात विठ्ठलराव शिंदे प्रशाला अंबड या संघाला ३-० ने पराभव करत अंतिम सामन्यात पोहोचले व अंतिम सामन्यात विश्व अॅकॅडमी या संघाला २ - ० ने पराभव करत इंडियन मॉडेल स्कूल ने यश संपादन केले या यशस्वी खेळाडूंचे मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला

या संघाला शाळेचे क्रीडा शिक्षक दयानंद दणूरे,सहशिक्षक संतोष सोनकंटले ,हॉकी प्रशिक्षक मुन्ना होटगी,हॉकी मार्गदर्शक जरार कुरेशी,यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष सिद्धाराम म्हेत्रे,संस्थेचे उपाध्यक्ष अमोल जोशी सर,सायली जोशी मॅडम,संस्थेचे सचिव शीतलताई म्हेत्रे,बीएड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गणपती वाघमोडे, मुख्याध्यापिका गौरी दातार मॅडम,यांच्यासह मान्यवरांनी हॉकी स्पर्धेतील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## इंदापूर येथे पैगंबर जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर /अतुल सोनकांबळे : गुरुवार दिनांक १९ सप्टेंबर रोजी इंदापूर येथे मुस्लिम बांधवांच्या वतीने पैगंबर जयंतीच्या निमित्ताने मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते.सकाळी चांद-तारा मस्जिद कसबा येथून भव्य मिरवणूक काढण्यात आली.

इंदापूर या ठिकाणी गुरुवार दिनांक १९ सप्टेंबर रोजी मिरवणुकीचे व पैगंबर जयंती चे आयोजन करण्यात आले होते.गणेशोत्सव असल्यामुळे दोन दिवसानंतर आयोजन करण्यात आले. प्रशासनाला सहकार्य करण्याच्या साठी मुस्लिम समाजाने गणपती विसर्जनानंतर मिरवणूकीचे आयोजन केले.गुरुवार या दिवशी विद्युत मंडळाने विद्युत पुरवठा चालू ठेवून सहकार्य करणे अपेक्षित होते.परंतु लोड शेडिंग च्या नावाखाली इंदापुरात विद्युत पुरवठा बंद ठेवण्यात आला होता. मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी सरबत,आईस्क्रीम,पाणी इत्यादी पदार्थ ठेवण्यात आले होते.विद्युत पुरवठा बंद असल्यामुळे थंड पदार्थांवर परिणाम होत होता. त्याचप्रमाणे भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते त्या ठिकाणी अडचणी येत होत्या. त्यातच मस्जिद परिसरातील पाण्याच्या मोटारी बंद झाल्याने हजारो नागरिकांच्या अडचणीत भर पडली. प्रशासनाशी तथा एम एस ई बी च्या वरिष्ठांशी विद्युत पुरवठा चालू करण्यासंदर्भात संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संबंधितांनी कुठलाही प्रतिसाद दिला नाही. त्याचप्रमाणे मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद दिला नाही.त्यामुळे मुस्लिम बांधवांनी तथा उपस्थित सर्व धर्मीय मान्यवरांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

मिरवणुकीत इंदापूर शहरासह परिसरातून मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव सहभागी झाले होते. अबाल वृद्धां बरोबरच लहान मुले, मुली व तरुण पारंपारिक वेशात सहभागी झाले होते. त्यांचा उत्साह वाखाणण्यासारखा होता. हातात पैगंबर साहेबांच्या सुविचारांचे फलक, विविध रंगांचे झेंडे, सर्वधर्मीय एकतेचा संदेश देणारे शायरी चे फलक घेऊन शिस्तबद्ध पद्धतीने कसबा येथुन सुरू झालेली मिरवणूक सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.कसबा येथून निघालेली मिरवणूक नेहरू चौक, मेन रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, (खडकपुरा) वेंकटेश नगर, बाबा चौक, हायवे,शेख मोहल्ला, माळी गल्ली, बागवान मोहल्ला मार्गे दर्गा मस्जिद चौक येथे आली.या ठिकाणी दर्गा मस्जिद मध्ये समारोप करण्यात आला.मिरवणूक मार्गावर चौकात व अनेक ठिकाणी विविध संघटना,ग्रुप तसेच विविध मान्यवरांनी मिठाई,सरबत वाटप, तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली होती.चांदतारा ग्रुप कसबा, इंदापूर शहर नागरी संघर्ष समिती,तेज पृथ्वी ग्रुप,अंजुमन रजा ए मुस्तफा गृप, अहमद रजा गृप,ए पी कंपनी,इंदापूर शहर बागवान जमात, मौलाना आझाद चौक गृप, ए.पी.जे.अब्दुल कलाम प्रतिष्ठान तसेच दर्गा मध्ये चौक या ठिकाणी विविध मान्यवरांनी स्वागत केले.माजी मंत्री हर्षवर्धन पाटील तसेच सोनाई परिवाराचे कार्यकारी संचालक अतुलशेठ माने यांनी दर्गा येथे भेट देत दर्शन घेतले.




तसेच सर्व मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.मिरवणूक मार्गावर सर्वश्री भरतशेठ शहा, महारूद्र पाटील, कैलास कदम, प्रा.कृष्णाजी ताटे सर, तेज पृथ्वी ग्रुप च्या संस्थापक अध्यक्षा अनिता ताई खरात, वंचित आघाडी चे सुभाष खरे,उमेश मखरे इत्यादी मान्यवरांनी स्वागत केले.एच के जी एन ग्रुप व इंदापूर शहर बागवान जमात यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.याची सुरूवात इंदापूर चे तहसीलदार बनसोडे, पोलिस निरीक्षक सुर्यकांत कोकणे,भरतशेठ शहा, अनिता ताई खरात इत्यादी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली.या शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला.सर्व सहभागींना फळे व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.मिरवणूकीसाठी इंदापूर पोलिस स्टेशन चे वरीष्ठ पोलिस निरीक्षक सुर्यकांत कोकणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. मिरवणुक शांततेत पार पडली.इंदापूर मुस्लिम जमातच्या वतीने दर्गा मस्जिद या ठिकाणी सर्व उपस्थितांची भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

**रिपाइंचे जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांची जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे मागणी**

**जिल्ह्यातील व तालुक्यातील गॅस एजन्सी धारकांना**

# वजनकाट्याद्वारे वजन करून ग्राहकांना सिलेंडर विक्री करण्याची सक्ती करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गॅस बुकिंग ते घरपोहोच सिलिंडर वितरणासाठी ऑनलाइन प्रणाली वापरण्यात येते. त्यामुळे गॅस सिलिंडरचा काळाबाजार थांबल्याचे सांगितले जात होते. आता मात्र सिलिंडरचे वितरण करणाऱ्या काही कर्मचाऱ्यांकडून (डिलिव्हरी बॉइज) सिलिंडरमधील गॅस चोरी करून तो दुसऱ्या सिलिंडरमध्ये भरण्याचा प्रकार घडत आहेत.

### प्रशासनाच्या नियमांकडे दुर्लक्ष...

गॅस सिलिंडरचे वजन कमी असल्याच्या तक्रारीबरोबरच घरपोहोच सिलिंडर दिल्यानंतर डिलिव्हरी बॉइज ग्राहकांकडे जादा पैशांची मागणी करतात, अशा तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे येतात. या पार्श्वभूमीवर गॅस पोहोचवतानाच ग्राहकांनी मागणी केल्यास सिलिंडरचे वजन तत्काळ करता यावे, यासाठी वजनकाटा सतत सोबत ठेवावा. प्रत्यक्ष घरी जाऊन सिलिंडर द्यावे. रस्त्यावर सिलिंडर वितरित करू नये, अशा सूचनाही सर्व गॅस कंपन्यांना जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आल्या होत्या. मात्र, याची अंमलबजावणी गॅस एजन्सी तसेच कंपन्यांकडून होताना दिसत नाही. त्यामुळे गॅस वितरण करणाऱ्या गॅस एजंन्सी धारकांसाठी वजन काटा सोबत ठेऊन ग्राहकांना गॅस वितरीत करण्यासाठी परिपत्रक काढून सक्ती करावी जेणेकरून सिलेंडर मधून गॅस चोरी करण्याचे प्रकार होणार नाहीत या मागणीसाठी जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी यांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) गटाचे जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांनी निवेदन दिले.

गॅसचा काळाबाजार करण्यासाठी या कर्मचाऱ्यांनी नामी शक्कल शोधली आहे. त्यामुळे ग्राहकांना दोन ते अडीच किलो गॅस कमी मिळत आहे. यामुळे गॅस सिलिंडर लवकर संपतात. कमी वजनाचे गॅस ग्राहकांच्या माथी मारले जात असून, मापात पाप करण्याच्या घटना घडताना दिसत आहे. गॅस सिलिंडरमधील गॅसची चोरी करण्याचा प्रकार घडत आहेत.

यामुळे ग्राहकांना आर्थिक तोटा तर सहन करावाच लागतो. तसेच त्यांच्या जीवाशी खेळण्याचा हा प्रकार आहे. गॅसची चोरी करताना नोझलमधील वायसर खराब होऊन सिलिंडरमधून गॅसगळती होण्याची शक्यता असते. यामुळे ग्राहकांच्या जीवाला धोका पोहचू शकतो. यामुळे अपघात होण्याचा धोक्याचा संभव आहे.

**ग्राहकांच्या समजूतदारपणाचा गैरफायदा**

गॅस सिलिंडर देतेवेळी डिलिव्हरी बॉइजने सिलिंडरचे वजन करून देणे आवश्यक आहे. हा ग्राहकांचा अधिकार आहे. मात्र, ग्राहकांनी वजन करण्याची मागणी केली असता वजनकाटा खराब, आज वजन काटा आणला नाही. अशी कारणे देऊन डिलिव्हरी बॉइज सिलिंडरचे वजन करण्याचे टाळतात. यातून ग्राहकांची फसवणूक होते.



गॅसची चोरी करून हा गॅस व्यावसायिक सिलिंडर अथवा घरगुती सिलिंडरमध्ये भरला जातो. तसेच गॅस कंपन्यांचे नोझलवर असलेले सीलसुद्धा अशा पद्धतीने पुन्हा चिकटवण्यात येते. त्यामुळे ग्राहकांना गॅसची चोरी झाली असेल, अशी शंकासुद्धा येत नाही. वजन योग्य असेल, असे ग्राहकांना वाटते. ग्राहकांच्या हा समजुतदारपणाचा गैरफायदा घेऊन कमी वजनाचे गॅस त्यांच्याकडे सोपवले जातात.

**गॅस ग्राहकांसाठी महत्त्वाचे...**


गॅस वितरण करणाऱ्या व्यक्तीने वजनकाटा ठेवणे आवश्यक आहे. सिलिंडरच्या वजनाबाबत शंका आल्यास वजन करण्याचा आग्रह धरा. घरपोहोच गॅस सिलेंडर पोहोचणे एजन्सीवर बंधनकारक आहे.

## राजवर्धन पाटील यांचे हस्ते शासकीय सेवेत निवड झालेल्या युवकांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/ अतुल सोनकांबळे

शहाजीनगर येथे नीरा भीमा सहकारी साखर कारखान्याचे संचालक व युवा नेते राजवर्धन पाटील यांचे हस्ते शासकीय सेवेत निवड झालेल्या तसेच सध्या विविध पदांवरती कार्यरत असलेल्या युवकांचा सत्कार गुरुवारी (दि. १९) करण्यात आला. या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन राजवर्धनदादा तरुण गणेशोत्सव मंडळ शहाजीनगर (खंडोबाचीवाडी) व राजवर्धनदादा युवा मंच शहाजीनगर यांच्या वतीने करण्यात आले होते.



यावेळी बोलताना राजवर्धन पाटील म्हणाले, ग्रामीण भागातील युवकांची शासकीय सेवेत मोठ्या संख्येने निवड होत आहे, ही आनंदाची बाब आहे. अशा सन्मानामुळे सध्या स्पर्धा परीक्षेच्या अभ्यास करणाऱ्या युवकांना निश्चितपणे प्रेरणा मिळणार आहे. यावेळी भाषणात राजवर्धन पाटील यांनी सत्कारमूर्ती युवकांना व त्यांच्या कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या. तसेच या चांगल्या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल राजवर्धन पाटील यांनी राजवर्धनदादा तरुण गणेशोत्सव मंडळ व राजवर्धनदादा युवा मंचाच्या कार्यकर्त्यांना धन्यवाद दिले.

दैनिक
यश सिद्धि न्यूज

शनिवार दि. २१ सप्टेंबर २०२४ 

कृषी....



## पशुसंवर्धन विभागाचे योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

सोलापूर (जिमाका) : पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांच्या कडील सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा परिषद उपकर योजना व जिल्हा वार्षिक योजनेमधून वैयक्तीक लाभाच्या विविध योजनेतील वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्यात येतात. यासाठी पात्र लाभार्थींनी २२ ऑक्टोंबर २०२४ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांनी केले आहे. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या शेतमजुर व शेतकऱ्यांना ७५ % अनुदानावर ४ शेळया व १ बोकड वाटप करणे . ५०% अनुदानावर पशुपालकांना मिल्कीग मशिन पुरविणे. ५०% अनुदानावर मुरघास निर्मीतीस प्रोत्साहन देणे अंतर्गत सायलेज बॅग वाटप करणे. जिल्हा वार्षिक योजना दुभत्या जनावरांना खादय उपलब्धतेसाठी सुधारणा कार्यक्रम (वैरण व पशुखादय विकास कार्यक्रम) ५०% अनुदानावर मुरघास निर्मितीस प्रोत्साहन देणे अंतर्गत सायलेज बॅग खरेदी करणे . खनिज मिश्रण वापरासाठी कमाल २ दुधाळ पशुधनासाठी ३३% अनुदान देणे. वरील योजनांसाठी पात्र लाभार्थीकडुन अर्ज मागविण्यात येत असुन सदरचे अर्ज दिनांकः २३ सप्टेंबर २०२४ पासून पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती तसेच सर्व पशुवैदयकीय दवाखान्यामध्ये उपलब्ध आहेत. तसेच जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर (www.zpsolapur) उपलब्ध आहेत. अर्ज स्वीकारण्याची अंतीम तारीख दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ आहे. तरी इच्छुक पात्र लाभार्थीनी वरील योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष, कृषी पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कूलदीप जंगम, उपाध्यक्ष, कृषी पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती तथा अति. मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. नरळे एन. एल. यांनी केले आहे.

# अंतरवाली सराटी येथे चेअरमन अभिजीत पाटलांनी मनोज जरांगे पाटलांच्या उपोषणाला दिली भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गरजवंत मराठा समाजासाठी लढणारे मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती अत्यंत खालावत चालली आहे. महाराष्ट्रातील तमाम मराठा समाज बांधवांच्या भावना जोडल्या गेल्यामुळे आता तरी सरकारने त्यांच्या उपोषणाची तात्काळ दखल घेऊन समाजाला न्याय द्यावा. असे आवाहन विठ्ठल सह साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी केले.

**सरकारने तात्काळ मराठा आरक्षणाबाबत तोडगा काढण्याचे अभिजीत पाटील यांनी केले आवाहन**

मागील चार दिवसापासून सुरू असलेल्या अंतरवाली सराटी येथे मराठा समाजाला आरक्षण मिळावे. यासाठी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी आपले उपोषण सुरू केले आहे. त्या ठिकाणी आज दि.२० सप्टेंबर रोजी श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी आंतरवाली सराटी येथे जाऊन मराठायोद्धा मनोज जरांगे पाटील यांची भेट घेत तब्येतीची विचारपूस केली.


अंतरवाली सराठी येथे भेटी दरम्यान औदुंबर महाडिक-देशमुख, आबासाहेब साठे, ऋषिकेश तांबिले, वाय.जी. भोसले, रणजित भोसले, जनक भोसले, पंकज लामकाने, अनिल यादव, कुलदीप कोलगे, शहाजी मुळे, दादासाहेब शिंदे, दिंगबर खडके, दादा पाटील, राज लोंढे, सचिन पाटील, महेश खटके, अतुल गायकवाड, सुनिल भोसले, कालिदास साळुंखे, सरपंच सोमानाथ झांबरे, विकास पाटील, नवनाथ नाईकनवरे, गोपाळ पाटील यासह आदी उपस्थित होते..

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला भेट दिली असता त्यांची तब्येत खालावली असून बोलायला, बसायला सुध्दा त्राण उरला नाही..मनं सुन्न झालं! मराठा समाजाच्या लेकरांच भलं व्हावं म्हणून तडफडणारा जीव बघितला. मनोजदादा आपण काळजी घ्या; आपली समाजाला गरज आहे. महाराष्ट्रातील तमाम मराठा समाज बांधवांच्या




भावना जोडल्या गेल्यामुळे सरकारने त्यांच्या उपोषणाची तात्काळ दखल घेऊन मराठा समाजाच्या मागण्या मान्य कराव्यात आणि समाजाला न्याय द्यावा..हि कळकळीची विनंती अभिजीत पाटील यांनी केली.

# दिल्लीत सोलापूर विमानतळ संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर विमानतळा संदर्भात नवी दिल्ली येथे केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मा. श्री. मुरलीधरजी मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक पार पडली. सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक वर्षांपासून सोलापूर विमानतळावरून विमानसेवा सुरू करण्याची मागणी होत होती. ती आता पूर्णत्वास जात आहे. यामुळे ही सोलापूरकरांसाठी आनंदाची बातमी आहे.

उडान योजनेअंतर्गत नवीन हवाई रस्ते मंजूर करण्याची प्रक्रिया सुरु आहे, जी ऑक्टोबर महिन्याच्या अखेरपर्यंत चालणार आहे व याअंतर्गत नोव्हेंबर महिन्यामध्ये विमानसेवा सुरू होईल. यात सोलापूर ते गोवा, सोलापूर ते तिरुपती, सोलापूर ते हैद्राबाद, सोलापूर ते मुंबई या दरम्यानच्या हवाई मार्गांना प्राधान्याने घेतले जाईल.

बैठकीस उपस्थित ळीश्रळपश प्रतिनिधीकडून काही लोशीलळरश्र षश्रळसहीं सुद्धा सुरू करण्याचे नियोजन असून त्यासंदर्भातही बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा करण्यात आले.

या बैठकीस सोलापूरचे भाजपा जिल्हाध्यक्ष सचिन दादा कल्याणशेट्टी, जिल्हाधिकारी श्री. कुमार आशीर्वाद, मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी, Fly 91 व Alliance Air चे प्रतिनिधी उपस्थित होते.

# अक्कलकोटमध्ये ईद-ए-मिलाद उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : प्रतिनिधी अक्कलकोट ईद-ए-मिलाद-उन-नबी निमित्त माणिक पेठ जमत (सिरत कमिटी अक्कलकोट) कडुन अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने अक्कलकोट शहरातील माणिक पेठ येथुन सकाळी ९ वाजता भव्य जुलुस(मिरवणूक) काढण्यात आली.

या जुलूस मध्ये अक्कलकोट सह अक्कलकोट तालुक्यातील ग्रामीण भागातील हजारो मुस्लिम बांधव सहभागी झाले होते. ठिकठिकाणी विविध मुस्लिम बांधव मित्रपरिवाराकडून मिठाई,शरबत, ज्यूस,सुगंधी दूध, व पाणी वाटप करण्यात आले. सदर रॅली माणिक पेठ ईदगहा येथुन निघुन, शहरातील मुख्य मार्गावरून कारंजा चौक,आरिफ शेरीकर,चौक सावरकर,चौक सेंट्रल चौक, फतेसिंग चौक,नाईकवाड गल्ली, रजिअल्लाह टेक,एवन चौक,बस स्टॅन्ड,हन्नूर चौक,बुधवार पेठ येथुन फिरुन या जुलूसचे समारोप माणिक पेठ ईदगहा मैदानावर झाले.

या रॅली मध्ये लहान मुले,तरूण,तसेच वयोवृद्ध माणसे तसेच चारचाकी वाहने,दुचाकी,या रॅलीत सहभागी होते, यावेळी तरुणाई मध्ये व लहान मुला मुली मध्ये ईद-ए-मिलादू-नबी च्या जुलूस मध्ये उत्साह पायाला मिळाला.

या वेळी माणिक पेठ ईदगहा येथै



सलाम,दुवा दाता पीर साहेब यांच्या हस्ते करण्यात आली, व रिक्षा सजावट केलेल्यांना पारितोषक हि देण्यात आले. जुलूस मध्ये सहभागी झालेल्या सर्व मुस्लिम बांधवांसाठी जेवणाची व्यवस्था ही सिरत कमिटी माणिक पेठ जमाततर्फे करण्यात आली होती. तसेच कारंजा चौक येथे नगरसे वक मित्रपरिवार ग्रुप तर्फे रिक्षा सजावट करण्यात आलेल्यांना पारितोषिक देण्यात आले. प्रथम पारितोषिक (मक्का मदिना) मौलाली गल्ली मुख्तार शेख यांना देण्यात आले.

संध्याकाळी ७ वाजत आरिफ शेरीकर चौक येथे सिद्धाराम म्हेत्रे, मल्लु पाटील,अशपाक बलोरगी, दाता पीर साहेब, पिरजादे साहेब, सद्दाम शेरिकर, ननु कोरबु, महेश हिंडोळे, नावीद डांगे, रशिद खिस्तके, इरफान कोरबु,शकील नाईकवाडी,इरफान दावणा व मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते. माजी नगरसेवक सद्दाम शेरीकर व एस एस सोशल ग्रुप मित्र परिवार यांच्या तर्फे ईद-ए-मीलादुनबी निमित्त काडण्यात आलेल्या रिक्षा सजावट करण्यात आलेल्याना परिपोष देण्यात आले.

यंदाच्या वर्षी गणेश विसर्जन आणि ईद-ए-मिलादूनबी एकाच दिवशी होती म्हणून हिंदु-मुस्लिम दोघांसाठी १६ सप्टेंबर दिवस महत्त्वाचा होता. परंतु १०व्या दिवशी अनंत चतुर्थीच्या दिवशी गणेश विसर्जन मिरवणूक निघतात मोठ्या संख्येने भावीक रस्त्यावर उतरतात शहरात विसर्जनाचा मोठा उत्साह असतो मोठी गर्दी रस्त्यावर असते.(गणेश विसर्जन व ईद-ए-मिलाद एकच मार्ग असल्याकारणाने) ही बाब लक्षात घेऊन माणिक पेठ सिरत कमिटी कडून हिंदू मुस्लिम सामाजिक सलोखा कायम राहावा म्हणून ईद-ए-मिलादुन्नबी १६ सप्टेंबर ऐवजी १९ सप्टेंबर रोजी जुलूस काढण्याचा निर्णय घेतला.

# महिलेची सोशल मिडीयावर झालेली ओळख एका जिल्हा परिषद शिक्षकाला चांगलीच महागात पडली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बार्शी/प्रतिनिधी : सोशल मिडियावर फ्रेंड रिक्वेस्ट टाकली, चॅटिंग सुरू झाले. त्या महिलेने कोरफळे (ता. बार्शी) येथे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकास भेटायला बोलावून चोप देऊन १० तोळ्याच्या दागिन्यांसह २७ हजार रुपये रोख व मोबाईल लंपास केला.

बार्शी तालुका पोलीस ठाण्यात महिलेसह चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे. स्वाती भोसले, सच्या, अमल्या, एक अनोळखी अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. अण्णा वाघमारे (वय ४६, रा. कोर्टी, ता. पंढरपूर) शिक्षकाने फिर्याद दाखल केली. ही घटना कोरफळे शिवारात दुपारी दीड वाजता घडली. आनंदनगर टाकळी (ता. पंढरपूर) येथील जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असलेले प्राथमिक शिक्षक अण्णा वाघमारे यांना १४

**भेटायला बोलावुन त्या शिक्षकास चोप देत १० तोळे सोने केले लंपास**

सप्टेंबर २०२४ रोजी सोशल मीडियावर फ्रेंड रिक्वेस्ट आली. त्यानंतर चॅटिंग सुरू झाले. स्वाती भोसलेने तिचा मोबाईल नंबर दिला. परत व्हॉट्सॲप चॅटिंग सुरू झाले. आमच्यात जवळीक वाढल्याने सायंकाळी सात वाजता कोरफळे येथे भेटण्यासाठी या असे व्हि.डि.ओ. कॉल करून म्हणाली. त्यावेळी मी उद्या येतो, असे सांगितले. माझा मित्र संजय राऊत (रा. वाखरी, ता. पंढरपूर) असे दोघेजण माझ्या एम.एच. १३/डी.एफ. ९५५५ या चारचाकी वाहनाने कोरफळे येथे गेलो. त्यावेळी जाताना रस्त्यामध्ये दोन-तीन व्हि.डि.ओ. कॉल झाले होते.

आम्ही दुपारी एक वाजता कोरफळे येथे पोचलो होतो. व्हि.डि.ओ. कॉल सुरू असतानाच मित्राला गावातच सोडून तुम्ही एकटे पानगाव रस्त्याने या असे सांगताच दोन किलोमीटरवर रस्त्याच्या कडेला स्वाती भोसले उभी होती. तिला गाडीमध्ये बस, असे म्हणताच तिने सच्या, अमल्या अशी हाक मारली. त्यानंतर तिघेजण पळत आले. मारहाण करून मला गाडीच्या बाहेर काढून शेतामधील झाडाखाली नेले तिथे मारहाण केली. अंगावरील चार तोळ्याचे ब्रेसलेट, चार तोळ्याची चेन, दोन तोळ्याच्या दोन अंगठ्या, मोबाईल, रोख २७ हजार रुपये काढून घेतला. यावेळी शेळ्या राखणारा शेतकरी तरुण सूरज तेथे आला. सूरजने आमच्या शेतात तुम्ही काय करता ? म्हणून त्यांना शिव्या दिल्या व दगडे मारू लागला. त्यावेळी सर्वजण दोन दुचाकीवर निघून गेले, असे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मिठू जगदाळे करीत आहेत.

# वृद्धांना अन्नदान करून केला वाढदिवस साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष राजेंद्र कोरके- पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा पंढरपूर शहर तालुका यांच्या वतीने गोपाळपूर येथील मातोश्री वृद्धाश्रम याठिकाणी असणार वृद्धांना अन्नदान करून त्यांचा वाढदिवस मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला.



तत्पूर्वी वाढदिवसाच्या औचित्य साधून संघाचे सर्व पदाधिकारी व कार्यकारणी सदस्य यांच्या वतीने राजेंद्रजी कोरके-पाटील यांचा सत्कार करून केक कापून संघाच्या कार्यालयामध्ये वाढदिवस साजरा करण्यात आला त्यानंतर मातोश्री वृद्धाश्रम गायकवाड अन्नदानाचा कार्यक्रम महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा पंढरपूर यांच्या वतीने पंढरपूर शहरातील संघाची सर्व पदाधिकारी व कार्यकरणी सदस्य यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झालेल्या कार्यक्रमांमध्ये आपले मनोगत व्यक्त करताना पंढरपूर तालुका अध्यक्ष रामदास नागटिळक म्हणाले सध्याच्या परिस्थितीमध्ये वाढदिवस मोठ्या मोठ्या प्रमाणात खर्च करून साजरा करत असतात कोरके-पाटील यांचा कुठल्याही प्रकारचा अनाठाई खर्च न करता येतील वृद्धांना अन्नदान करून केलेला कार्यक्रम कौतुकास्पद अशा प्रकार चे मत त्यांनी शेवटी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रथम वृद्ध माता यांच्या हस्ते औक्षण व वृद्धपिता यांच्या हस्ते सत्कार करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमात यशस्वी करण्यासाठी सर्वश्री पंढरपूर तालुका अध्यक्ष रामदास नागटिळक संतोष मोरे रोहन नरसाळे कुमार कोरे संजय ननवरे राजेश बादले पाटील ड संतोष माने सुदाम मोरे आधी पत्रकार बंधू सह मातोश्री वृद्धाश्रमतील सर्व स्टाफ उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रस्ताविक व आभार पत्रकार धनाजी राक्षे यांनी केले

**शिवानुभव गोष्ठीत 'महाराष्ट्राचे शरण' विषयावर व्याख्यान**

**प्रा. डॉ. गुरुसिद्धैय्या स्वामी यांचे प्रतिपादन**

# मंगळवेढातूनच बसवण्णांच्या सामाजिक चळवळीची सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा (प्रतिनीधी) : बसवण्णा हे सामाजिक चळवळीचे नेते, सोलापूरचे सिद्धराम, हविनाळ कल्लय्या, पुळूजचे अमुगे देवय्या-रायम्मा,नांदेडचे उरीलिंगपेद्दी,गुड्डापूरचे दानम्मा, या सर्व शरण महाराष्ट्रातील वैभव आहे. बसवण्णांनी आपले सामाजिक चळवळीची सुरुवात मंगळवेडातूनच केली. असे अक्कलकोट खेडगी महाविद्यालयचे प्राध्यापक डॉ. गुरुसिद्धैय्या स्वामी आपले अभिप्राय व्यक्त केली .

शनिवारी येथील जागतिक लिंगायत महासभा सोलापूर आणि किरीटेश्वर संस्थान मठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दुसऱ्या शिवानुभव गोष्ठीत 'महाराष्ट्राचे शरण' या विषयावर ते बोलत होते.

किरीटेश्वर संस्थानमठाचे पूज्य स्वामिनाथ महास्वामी, बसव केंद्राचे सिंधुताई काडादी, जागतिक लिंगायत




महासभा राज्य युवा अध्यक्ष लातूरचे रवी बिराजदार, उपाध्यक्षा मीनाक्षी बागलकोटे, महासभा चे सचिव नागेंद्र कोगनुरे, बसवराज मसुती व्यासपीठावर उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. गुरुसिद्धैय्या स्वामी त्यांनी महाराष्ट्रातील सर्व शरण-शरणींचे थोडक्यात ओळख करून दिली.

जागतिक लिंगायत महासभा राज्य युवा अध्यक्ष लातूरचे रवी बिराजदारा आपले विचार मांडताना, सोलापूर प्रमाणेच लातूरमध्येही लिंगायतांचा प्रभाव आहे. ते शरण व त्यांचे वचनापासून लांब होते कारण वचन साहित्य मराठीत मिळत नसे. अलीकडेश रण साहित्य, वचनांचे मराठीत भाषांतर झाले असून बसवण्णा व शरण यांचा परिचय होत आहे. गेल्या काही महिन्यांपासून आपण लिंगायत व शरन साहित्य परिचय चळवळ सुरू केली असून दर महिन्याला बसवकल्याण आणि मंगळवेढा येथे अनुभव मंडप सुरू करून मराठी लिंगायतांना शरण संस्कृतीव साहित्याची ओळख करून देत असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षस्थानी असलेल्या सोलापूर बसव केंद्राच्या अध्यक्षा सिंधुताई काडादी म्हणाल्या की, सोलापुरात लिंगायत व शरण चळवळीला चालना देणाऱ्या किरीटेश्वर मठाचे कार्य कौतुकास्पद आहे. किरीटेश्वर मठाचे तत्कालीन पूज्य लिंग. मृत्युंजय महास्वामी यांनी इतिहासात पहिल्यांदा 'विश्वगुरु बसवण्णांचा विजय असो' असा जयघोष केला होता. असे म्हणाले.

सानिध्य भूषविलेले किरीटेश्वर संस्थान मठाचे स्वामीनाथ महास्वामीजी म्हणाले त्यांचा मठ नेहमी बसवादी शरणाच्या तत्त्वांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी ओळखला जातो. जागतिक लिंगायत महासभेच्या उपक्रमांना त्यांचा मठ नेहमीच पाठिंबा देतो. येणाऱ्या काळात शरण तत्व व लिंगायत एकजुटीचे कार्यक्रम अधिकाधिक प्रमाणात सुरू ठेवावा, असे ते म्हणाले.

बसवण्णा व सिद्धरामेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन व ज्योती प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

पुनीत बिज्जरगी यांनी वचन गायन केले. महासभाचे युवा अध्यक्ष शिवराज कोटगी , शहराध्यक्ष विजय भावे, महिला अध्यक्षा राजश्री थळंगे, उपाध्यक्ष राजेंद्र खसगी, राजेंद्र हौदे, बसवराज लोहार, कविता हलकुडे, जयश्री शेठे, चिन्नम्मा बिज्जरगी, मधु कोळकुर, गीता थळंगे, पूर्णिमा तोटद , राजशेखर लोकापुरे, द.सोलापूरचे अध्यक्ष डॉ.बसवराज नंदरगी, गुरुसिद्ध बगले, श्रीकांत पारे यांच्यासह अनेकांची लिंगायत बांधव उपस्थित होते. जागतिक लिंगायत महासभेचे अध्यक्ष शिवानंद गोगाव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर शशिकला रामपुरे यांनी आभार मानले.

# खाजगी शाळा व सरकारी शाळा मध्ये सी.सी.टीव्ही कॅमेरे, सखी सावित्री समिती तरतुदीचे अनुपालन अंमलबजावणी करण्याची सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल कांबळे यांची प्रशासनाकडे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/बारामती : महाराष्ट्र राज्यात बदलापूर व पुणे जिल्ह्यातील मळद गांवात घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने सामाजिक तथा माहिती अधिकार कार्यकर्ते स्वप्निल कांबळे यांनी जिल्हा शिक्षण अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांना ई-मेल द्वारे निवेदन दिले आहे.

खाजगी शाळा व सरकारी शाळा मध्ये सी.सी.टीव्ही कॅमेरे बसवणे, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने घ्यावयाची काळजी,तक्रार पेटी, सखी सावित्री समिती बाबतच्या तरतुदीचे अनुपालन,विद्यार्थी सुरक्षा समितीचे प्रस्तावित गठन,राज्य सदस्य विद्यार्थी सुरक्षा आढावा समिती यांची अंमलबजावणी करण्याची मागणी स्वप्निल कांबळे यांनी गट शिक्षण अधिकारी यांना निवेदन देऊन केली आहे. दि.७ एप्रिल २०१६,दि.०५ मे २०१७, दि.१० मार्च २०२२,दि.१३ मे २०२२ व दिनांक २१ ऑगस्ट २०२४ च्या परिपत्रक कायद्याचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी मागणी केली आहे.

खाजगी शाळा व सरकारी शाळा मध्ये या कायद्या प्रमाणे तातडीने गटशिक्षण आधिकारी यांनी पत्रव्यवहार करून अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. जेणे करून अशा घटना भविष्यात घडणार नाही आणि जे संस्था चालक व मुख्याध्यापक हे या शासनाच्या परिपत्रक ,आदेशाचे उल्लंघन करतील त्याच्या वर या कायद्याने कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.